# १) ग्रामपंचायत




**ही** आमच्या ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत. एकेकाळी ग्रामपंचायतीची अशी भव्य इमारत नव्हती. चार पत्रांची साधी इमारत होती. पुरेसे फर्निचरही नव्हते. अशा छोटेखानी जागेत आम्ही तब्बल वीस वर्षेकाढली. दरम्यानच्या काळात गावाच्या प्रगतीची किर्ती सर्वदूर पसरली. लांबलांबून लोक गावाला भेट द्यायला येवू लागले.

गावाच्या लौकीकास साजेल अशी भव्य ग्रामपंचायतीची इमारत असावी असे आम्ही सर्व ग्रामस्थांनी मिळून ठरवले. पण प्रश्न पैशाचा होता, पैसा उभा कसा करावा. हे एक आव्हान होतं; पण म्हणतात ना इच्छा शक्ती मजबूत असेल, तर मार्ग आपोआप तयार होतात !

योगायोगाने महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजाताई मुंढे यांनी पाटोद्यास भेट दिली. गावाच्या कामाची चांगली वाखाणणी केली आणि त्याचबरोबर ३० लक्ष रूपये निधी ग्रामविकासासाठी दिला. काही प्रमाणात पैशांचा प्रश्न सुटला होता. पण जागा उपलब्ध नव्हती. आताच्या ग्रामपंचायतीच्या जागेवर जि. प. च्या शाळेची इमारत होती. ती इमारतही मोडकळीस आलेली होती. सर्वानुमते ती इमारत पाडून नवी ग्रामपंचायत इमारत



उभारण्याचे ठरविले. नुसता विचार करून आम्ही थांबलो नाहीत. तर ग्रामपंचायतीची भव्यदिव्य इमारत आकाराला आली. जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीच्या सभामंडपासाठी ३० लक्ष रूपये व ग्रामपंचायत बांधकामासाठी १२ लक्ष रूपये दिले. जि. प. च्याच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने सार्वजनिक स्वच्छतेसाठी म्हणून ५ लक्ष रूपये तर बी.आर.जी.एफ. ट्रेनिंग सेंटरसाठी १८ लक्ष रूपये दिले. स्वत: पाटोदा ग्रामपंचायतीने २० लक्ष



रूपये निधीच्या रूपाने खर्च केला. अशाप्रकारे पाटोदा ग्रामपंचायतीची ससज्ज अशी नवीन इमारत तयार झाली आमच्या या इमारती मध्ये वायफायची सुविधा उपलब्ध आहे !

ग्रामपंचायतीची इमारत दुमजली आहे. तळमजल्यावर प्रशस्त सभागृह, सभामंडप आहे. प्रत्येक भिंतीवर, छतावर ग्रामगितेतून घेतलेले



तुकडोजी महाराजांचे प्रेरणादायी विचार लिहिलेले आहेत. तळमजल्यावरच्या एका बाजुला पाटोद्याला मिळालेल्या, तसेच भास्कररावांना मिळालेल्या पुरस्कारांचे दालन आहे.

वरच्या मजल्यावर ग्रामपंचायतीचे मुख्य कार्यालय, मिटींग हॉल आहे. ऑटोमॅटिक दरवाज्याची व्यवस्था केलेली आहे. महापुरूषांच्या अर्धाकृती फलकांनी कार्यालयाची शोभा द्विगुणीत होते. इमारत बांधकामात व फर्निचर मध्ये अत्याधुनिक तंत्राचा वापर केलेला आहे. वॉशरूमचे दरवाजे तसेच आतील उपकरणे ऑटोमेटेड तंत्रज्ञानावर स्वयंचलित आहेत.

# २. गावाला प्राप्त पुरस्कार



जिव ईश्वराचा अंश । तो जितुका करी आपुला विकास ।
तितुका उच्च अवतार पदास । याच लोकी जातसे ॥

– ग्रामगिता

**स्वतः**, कुटुंब आणि त्यानंतर गाव ! प्रत्येक मनुष्याने स्वतः चा, स्वतःसह त्याच्या समुहांचा विकास साधणे फार आवश्यक आहे. दुबळ्या निराशावादाचा त्याग केला गेला पाहीजे. चांगलं केलं की त्याचा उदो उदो करणारे थोडे नाहीत; मात्र त्यासाठी अगोदर प्रामाणिक प्रयत्न आणि मेहनत आवश्यक आहे.

आम्ही ही एक गाव एक जीव होऊन प्रामाणिक मेहनत केली, कष्ट केले आणि आमचे काम पाहून गावाला अनेक प्रकारचे पुरस्कार मिळाले. आम्ही पुरस्कारांसाठी काम केले असे नाही; पण त्याने एक उर्जा मिळते. काम नव्याने करण्याची उमेद वाढते.

४ मे, २००७ रोजी महामहिम तत्कालीन राष्ट्रपती भारतरत्न अब्दुल कलाम साहेब यांच्या हस्ते केंद्र शासनाचा निर्मलग्राम पुरस्कार पाटोद्याला



मिळाला आणि तेव्हापासून गावाची पुरस्कार पटकावण्याची परंपरा अविरत सुरू आहे. तालुका, जिल्हा, विभाग, राज्य, देश, अशा सर्वच पातळ्यावर गावाला पुरस्कार मिळाले. वेगवेगळ्या मराठी तसेच इंग्रजी वृत्तवाहिन्यांवर गावाची चर्चा झाली. जे आम्ही केले ते तुम्हीही करू शकता फक्त इच्छाशक्ती दाखवून कामाला लागा.

गावाला प्राप्त पुरस्कारांची यादी

१. केंद्र शासनामार्फत ग्रामविकास अभ्यासाकरिता देशातील ११ ग्रामपंचायतीपैकी पाटोदा ग्रामपंचायतची निवड
   सन २०१५-१६
२. केंद्र शासनाचा निर्मलग्राम पुरस्कार
   ४ मे २००७ - (३ लक्ष)
३. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा राज्यस्तर प्रथम पुरस्कार
   सन २०११ - १२ (१२.५) लक्ष
४. पर्यावरण संतुलित समृद्ध योजने अंतर्गत पर्यावरण विकासरत्न पुरस्कार
   सन २०११ - १२ (१२ लक्ष)
५. केंद्र शासन पंचायत सबलीकरण व उत्तरदायीत्व प्रोत्साहन योजना पुरस्कार
   सन २०१३ - १४ (८ लक्ष)
६. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुरस्कार मराठवाडा विभागात प्रथम (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामपंचायत)
   सन २०११ - १२ (१० लक्ष)
७. यशवंत पंचायत राज अभियान मराठवाडा विभागात विशेष पुरस्कार
   सन २०१३ - १४ (३ लक्ष)
८. उत्कृष्ट पाणी व्यवस्थापन मराठवाडा विभागात विशेष पुरस्कार
   सन २००९ - १० (१ लक्ष)


**व इतर सतरा पुरस्कार**

**गावाची एकूण लोकसंख्या (जनगणना - २०११) प्रमाणे**

पुरुष १६५४ महिला १६९६ एकूण ३३५०

# ३. मसाला गिरणी / शेवया मशिन / पापड मशिन

ग्रामपंचायतीने स्थानिक नागरिकांच्या, महिलांच्या, गृहिणींच्या गरजांचा विचार करून त्यांना जास्तीत जास्त सुविधा कशा पुरविता येतील,



याचा सकारात्मक विचार करावा असे आमचे मत आहे. थोडेसे प्रलोभन, थोडीसी सवलत सेवा, खर्च या सर्वांचा ताळमेळ सरपंच आणि ग्रामपंचायत यांना साधता आला पाहिजे. ग्रामपंचायत ही गावातील आबालवृद्धांच्या गरजा समस्या पूर्ण करण्यास बांधील असते.

महिलांशी संबंधित, त्यांना आवश्यक असणाऱ्या काही सुविधा आमच्या ग्रामपंचायतीने देउ केल्या आहेत. आम्ही गावातच मसाला गिरणी, शेवया मशीन तसेच पापड मशीन सुरू केले आहेत. ग्रामपंचायतीचा कर भरणाऱ्या प्रत्येक कुटूंबाला या सुविधा मोफत मिळतात. त्यामुळे आमच्या गावात कर १०० टक्के भरला जातो व महिला मसाला, शेवया आणि पापड मोफत बनुन नेतात. अर्थात त्याचे साहित्य त्यांचे स्वत:चे असते. अशा उपक्रमांतून लोकांनाही ग्रामपंचायत काही सवलत देऊ लागली, असे समाधान असते आणि करवसुली विनासायस होते म्हणून ग्रामपंचायतही समाधानी असते.




पुर्वी भारतीयांच आर्युर्मान शंभर-सव्वाशे वर्ष असायचं,
आता सत्तर वर्ष झालयं, मग त्यात पाकीस्तानाचा हात आहे काय.



# ४. सि.सि.टि.व्ही. कॅमेरे

**जेथे** जावे तेथे मनुष्य स्वभाव सारखाच आहे ! एकांत बऱ्याचदा विकृतीला जन्म देतो. कळत नकळत तेव्हा माणसांकडून दुष्कृत्य घडण्याची शक्यता अधिक असते. अशावेळी सतत जागता पहारा देणारी मनुष्य यंत्रणा निर्माण करणे कठिण होते. पण तंत्रज्ञानाचा वापर करून आपण ही समस्या सोडवू शकतो. गावात वेगवेगळ्या ठिकाणी सि. सि. टि. व्ही. कॅमेरे बसवलेले असतील तर अशा दुष्कृत्यांना बऱ्याच अंशी आळा बसू शकतो. याच भावनेतून पाटोद्याच्या रस्त्यांवर, महत्वाच्या ठिकाणी एकूण ४२ सि. सि. टि. व्ही. कॅमेरे बसविण्यात आले.

मनात विचार आला आणि काम झाले असे होत नाही. सार्वजनिक काम तडीस नेण्यासंबंधीची एक विशिष्ट प्रक्रीया असते. त्याच्या माध्यमातून सर्व बाबी पार पाडतात.

आमच्या गावात सि. सि. टि. व्ही. कॅमेऱ्याचे पूर्ण काम होण्यासाठी



एकूण ८ लक्ष रूपये खर्च आला. टप्याटप्याने ३ कंपन्याकडून हे काम पूर्णत्वास गेले. एकदा सि. सि. टि. व्ही. कॅमेरे बसविले की काम झाले असे नाही. या कॅमेऱ्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी प्रती वर्षी १ लाख रूपये राखून ठेवले जातात. या कॅमेऱ्यामुळे आमच्या गावाला खूप फायदा झाला. ग्रामपंचायत, शाळा/अंगणवाडी, रस्ते, मंदिर, दलीत वस्ती अशा ठिकाणी हे कॅमेरे बसविले आहेत. आमचे ग्रामपंचायत कार्यालय २४ तास उघडे असते. कधी कधी सर्व कर्मचारी कामानिमित्त बाहेर असतात पण आतापर्यंत एखादी सुई एवढी वस्तुही इकडची तिकडे झाली नाही. रस्त्यांवर कचरा टाकण्यास कोणी धजावत नाही शाळा / अंगणवाडीचे कर्मचारी थेट प्रक्षेपणामुळे सजग आणि कर्तव्यतत्पर असतात.

सि.सि.टि.व्ही.कॅमेरे बसविण्यामागे आमचा गावांवर किंवा कर्मचाऱ्यावर विश्वास नाही असा नाही. पण आम्ही स्वत: स्वयंशिस्तीत व कर्तव्यतत्पर असावे म्हणून आम्हीच आमच्यावर आमचा पहारा देतोय असा त्याचा अर्थ आहे!

महादेवाला शिवरात्रीला बेल आवडतो, मग आपण बेल लावावा की तोडावा.

## ५. बायोमेट्रिक मशीन




**जि.प.** शाळेचे शिक्षक, अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन ग्रामपंचायत, तलाठी इ. कर्मचारी गावात काम करण्यासाठी असतात. परंतु ग्रामीण भागातील ही शोकांतिका आहे की, बऱ्याच लोकांना हे कर्मचारी आपल्या सेवेसाठी असतात हे माहित नाही किंवा त्यांची माहिती ठेवण्यात कोणाला रस नाही, उगीच चार चौघांच्या गप्पात शासनाला दोष देत बसण्यात काही मंडळीला स्वारस्य असते. पण आमच्या मते शासनाने गावपातळीवर सेवा देण्यासाठी योग्य ती यंत्रणा निर्धारित केलेली असते. त्या यंत्रणेत समन्वय निर्माण करणे पारदर्शी आणि चोख कारभार राबवून घेणे हे गावाचे, ग्रामपंचायतीचे काम असते. अशा वेळी धाक दडपशाही करणे, कर्मचाऱ्यांत दुजाभाव करणे इ. आवश्यक मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी होईल तितकी तंत्रज्ञानाची मदत ग्रामपंचायतीने घ्यायला हवी. या धारणेतून आम्ही ग्रामपंचायत कार्यालयातच बायोमेट्रिक मशिन बसविले आहेत. कोणत्याही कर्मचाऱ्याला काहीच न बोलता सर्वजण जबाबदारीने वेळेचे पालन करतील त्यामुळे सर्व कर्मचारी कार्यालयीन वेळेत कुठलीही सबब न दाखवता उपस्थित राहतात. याचा अर्थ आमच्या येथे शासकीय कर्मचाऱ्यांना यांत्रिक पणे वागविले जाते असे नाही. वेळोवेळी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजावून घेतो. बायोमेट्रिक मशिनमुळे प्रत्येक कर्मचारी वेळ काटेकोरपणे पाळतो. त्यामुळे कामांना गती येते व कामे लवकरात लवकर मार्गी लागतात.



## ६. देणगीदार


निर्मल ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा
गंगापूर (नै.) ता.जि. औ.बाद.
विकास कामात लोक सहभाग व देणगीदार

**पाटोद्याच्या** लौकीकास साजेल असेच पाटोदेकरही आहेत ! अनेक गावकऱ्यांनी गावासाठी आपल्या ऐपतीप्रमाणे, इच्छेप्रमाणे देणग्या दिलेल्या आहेत. ग्रामपंचायत कार्यालयात सभागृहाच्या भिंतीवर गावातील ज्या देणगीदारांनी गावांसाठी देणगी दिलेली आहे. त्यांच्या नावासह त्यांच्या देणगीचा उल्लेख करण्यात आला आहे. उल्लेख करण्यात आलेल्या देणगीदारांशिवाय ज्यांचा उल्लेख झालेला नाही असे देखील देणगीदार आहेत.


निर्मल ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा
गंगापूर (नै.) ता.जि. औ.बाद.
विकास कामात लोक सहभाग व देणगीदार

# ७. जिल्हा परिषद शाळा / अंगणवाडी




**शाळा** ह्या संस्काराची औपचारीक केंद्रे आहेत. त्यामुळे शाळेवर, शालेय शिक्षणांवर ग्रामपंचायत व गावकऱ्यांचे विशेष लक्ष हवे. असे आमचे मत आहे. शालेय प्रशासनाला केवळ धारेवर धरणे, नियमांवर बोट ठेवणे हे अपेक्षित नाही. तर शाळा आणि गाव, पालक, विद्यार्थी, प्रशासन या सर्वामध्ये सुसंवाद साधुन जास्तीत जास्त शैक्षणिक प्रगती कशी होईल. याकडे सर्व गावांने लक्ष दिले पाहीजे. आमच्या प्राथमिक शाळेचा परिसर, प्रत्येक वर्ग, कार्यालय हे सि. सि. टि. व्ही च्या निगराणी खाली आहे. सर्व प्रकारचे शालेय उपक्रम आमची शाळा राबवते. शाळेमध्ये इ. लर्निंगची सुविधा आहे. येत्या वर्षभरात गांवाबाहेर प्रशस्त जागेवर शाळेची दुमजली भव्य इमारत उभारण्याचा आमचा मानस आहे.

आमच्या गावात ३ अंगणवाड्या असून तीनही अंगणवाड्या आय.एस.ओ. मानांकन प्राप्त आहेत. अंगणवाडीमध्ये स्तनदा मातांना दुपारसत्रात अंगणवाडी ताई विशेष मार्गदर्शन करतात. त्यांनी त्याच्या आरामाची व्यवस्थाही अंगणवाडीत केलेली आहे. अंगणवाडीच्या पोषण आहार सोलर प्लेट च्या मदतीने शिजविला जातो.



# ८. सांडपाणी व्यवस्थापन / शोषखड्डे




**सांडपाण्याचे** व्यवस्थापन योग्य केलेले असेल तर गावाचे किमान दर्शनी रूप सुंदर दिसते. गटार उघड्यावर असेल तर त्यातील पाणी इकडे तिकडे पसरेल नालीत गाळ साचेल परिणामी गटार तुंबले जाईल. दुर्गंधी सुटेल.

आम्ही या सर्व बाबींचा खूप गांभिर्याने विचार केला आणि गावाचे सर्व सांडपाणी भुमीगत गटारांद्वारे खाम नदीत सोडले. केवळ इतक्यावरच आम्ही थांबलो नाहीत. गावाच्या बाहेर गावाचे सर्व सांडपाणी वाहून येते येथे जिरवण्याच्या हिशेबाने खोल चर खोदून त्यात वाळू विटा खडे टाकून पाणी साठवले जाते व उर्वरित पाणी नदीत जाते. गावांतून काढलेले सर्व गटारे भुमिगत असून विशिष्ट अंतरावर त्यांना उघडून पाहण्याची सोय केलेली आहे. दर महिन्याला आमचे ग्रामपंचायत कर्मचारी गटाराचे निरीक्षण करून कुठे काही अडथळा निर्माण झालाय का हे पडताळणी करून बघतात.

सन २००७ साली गावांला निर्मलग्राम पुरस्कार मिळाला. त्याचा मिळालेला पैसा गावांतील सांडपाणी व्यवस्थापणांसाठी वापरला गेला. करायचं असेल तर करण्यासारखं भरपूर आहे. मात्र इच्छाशक्तीचा अभाव असेल तर सहजसाध्य कामेही होत नाहीत !

निर्मलग्राम पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या प्रमाणात सांडपाणी व्यवस्थापनासाठी निधी शासनाकडून उपलब्ध होतो, हेच काहींना माहीत नाही हीच मोठी शोकांतिका आहे !

# ९. पिण्याचे पाणी व्यवस्थापन



**पाणी** हा जीवसृष्टीचा पाया आहे. आज पाण्याची समस्या अत्यंत बिकट होत चालली आहे. पावसाळ्यातले जेमतेम चार महिने सोडले तर पाण्यासाठी वणवण हा सगळीकडे ऐरणीवरचा प्रश्न निर्माण झाला आहे.पण आमचा पाटोदा याला अपवाद आहे असे आम्ही अभिमानाने सांगतो!

सन २००७-०८ साली महाप्रयत्नाने आम्ही जायकवाडीचे पाणी गावात आणले. ते पाणी कसे आणले व त्यासाठी काय करावे लागले याची हकीकत सचिन वाघमारे लिखित व संदर्भ प्रकाशन द्वारे प्रकाशित 'पाटोद्याचा विकासभास्कर' या पुस्तकात सविस्तर वर्णन केलेली आहे.

त्यानंतर नांदेडच्या एका वॉटर मॅनेजमेंट कंपनीशी करार करून वॉटर फिल्टरचा प्लँट गावातच सुरू केला. पुर्वीची गावातील नळ योजनाही कार्यान्वित होती. एकंदर पिण्याचे तीन प्रकारचे पाणी गावात उपलब्ध आहे.

पाणी मुबलक आहे म्हणून आम्ही त्याचा कसाही वापर करत नाही. आम्ही स्वयंशिस्तीने काही नियम बनविले आणि ते पाळत आहोत. यासाठी आम्ही तंत्रज्ञानाची मदत घेतली. गावातल्या प्रत्येक घराच्या समोर नळाच्या पाईपाला पाण्याचे मिटर बसविण्यात आले आहे जेणकरून पाण्याची नासाडी टाळता येईल. त्यासाठी फिल्टर वॉटरसाठी एक ऑटोमेटेड कार्ड वापरून



प्रत्येक कुटूंबाला रोज २० लिटर पाणी ग्रामपंचायत मोफत देते २० लिटरच्या नंतर प्रत्येक लिटरला ५ रूपये दराप्रमाणे शुल्क आकारला जातो. पाण्याच्या भिषण टंचाईच्या विळख्यात आजूबाजूचा परिसर पिचत असतांना आम्ही मात्र आमचे सुनियोजन, दुरदृष्टी व स्वयंशिस्तीच्या जोरावर पाणी टंचाईवर मात केली आहे ! पण हे आम्हीच करू शकतो असे नाही. तुम्हीही करू शकता मात्र त्यासाठी इच्छाशक्ती दाखवा एक पाऊल चालू लागा ..!!

# १०. वाढदिवस बोर्ड



**ग्रामपंचायत** कार्यालयाच्या समोरच मोठ्या वृक्षावर एक डिजीटल बोर्ड तुम्हांला दिसेल त्यावर लहान थोर, गरीब श्रीमंत, जात, धर्म, स्त्री पुरूष असा भेद न करता प्रत्येक पाटोदेकराच्या वाढदिवसाचे अभिष्टचिंतन केले जाते. रोजच्या व्यापात माणसे इतके व्यस्त असतात की, सणावारांचे विस्मरण होते. अशावेळी वाढदिवशी आपले नाव गावाच्या दर्शनी भागावर झळकते, याचा आनंद नागरिकांना असतो. अशा छोट्या-छोट्या उपक्रमांतून एकमेकांना एकमेकांशी जोडण्याचेच काम आम्ही पाटोदकर करत असतो. खर पाहू गेलं तर हा उपक्रम तसा छोटाच, पण त्यातून गावात एक वातावरणनिर्मित होते. परस्परांतील संबंध दृढ होतात.



# ११. पिठ गिरणी




**अफलातून** कल्पना आम्हांला कशा सुचतात याचा आम्हांलाच उलगडा होत नाही. ग्रामपंचायतीचा कर भरणे, हे प्रत्येक गावकऱ्याचे कर्तव्य आहे. मात्र बऱ्याचदा हे कर्तव्य ते पार पाडत नाहीत. अशा वेळी नियमांची भाषा, कायद्याचा बडगा याच्यापेक्षा गावकरी स्वत:हून कर भरण्यास पुढाकार घेतील अशी अफलातून युक्ती करणे गरजेचे होते. यातूनच 'भारतातील पहिली मोफत पिठाची गिरणी' पाटोद्यात अस्तित्वात आली. ग्रामपंचायतीचा कर आगाउ भरणाऱ्याला किंवा नियमित भरणाऱ्याला वर्षभर ही पिठाची गिरणी मोफत असते. वर्षभर या गिरणीतून करदाता गावकरी कितीही दळण विनामूल्य दळून नेउ शकतो.

चांगल्याची सुरूवात केली की अनेक चांगले हात पुढे येत असतात. आणि विशेष करून चांगल्याचे स्वागत करणे ही पाटोद्याची परंपरा आहे. आमच्या गावांचे एक सुजाण नागरीक श्री लहू जगन्नाथ पेरे यांनी पिठाची गिरणी सुरू करण्यासाठी ग्रामपंचायतीला १ लाख रूपये अनामत रक्कम दिली. त्यातून पिठाची गिरणी सुरू झाली. या गिरणी संकल्पनेला गावकऱ्यांकडून भरपूर प्रतिसाद मिळाला. करवसुली अनेक पटीने वाढली. अशा नवनविन कल्पना स्थळकाळपरत्वे कल्पकतेने महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींनी राबवाव्यात. जेणेकरून ग्रामपंचायतीचा कारभार अधिक गतीमान होण्यास मदत होईल.

आम्ही आमच्या गांवात ही योजना यशस्वीरित्या राबवित आहोत. आपणही आपल्या गावांत अशा प्रकारच्या योजना राबवून ग्रामविकास साधाल, अशी आम्ही आशा व्यक्त करतो.

जर मांजरे आडवी गेली तरी चालते, पण एक माणूस आडवा गेला
तर गावाच्या विकासात खुप फरक पडतो.



# १२. सोलर वॉटर हिटर



**आ**पल्याकडे झाडे तोडू नका सांगणारे खुप आहेत, पण चुलीत काय घालायचे हे कोणीचं सांगितले नाही, आम्ही त्यावर थोडा विचार केला, आणि अंमलबजावणीही केली.

ग्रामपंचायत कार्यालयांवर ५ आणि गिरणी घराच्या छतावर तीन असे सहा आणि दलीत वस्तीत स्वतंत्र स्टॅण्ड उभारून एक, असे नऊ सोलर वॉटर प्लॉन्ट गावात बसविण्यात आले आहेत. या प्लॉन्टच्या माध्यमातून गावकऱ्यांना सकाळी सकाळी गरम पाणी अंघोळीसाठी विनामूल्य उपलब्ध होते. एका एका वॉटर हिटरची क्षमता १००० लिटर आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गृहिणींवरचा बराचसा ताण कमी झाला आहे. त्याचबरोबर इंधन बचत होण्यासही त्यामुळे मदत झाली आहे.

# १३. सार्वजनिक स्वच्छतेचे उपक्रम

**वै**यक्तिक स्वास्थ्यासाठी जशी वैयक्तिक स्वच्छता आवश्यक आहे, त्याचप्रमाणे गावाच्या स्वास्थ्यासाठी सार्वजनिक स्वच्छता आवश्यक आहे. आम्ही सार्वजनिक स्वच्छतेसाठी गावात विविध उपक्रम राबविले आहेत.

सरपंचाचे म्हणणे आहे की, लोक ऐकत नाही,
मग निवडून कसे आला आहात.

आज गावाच्या चार बाजुंना चार धोबिघाट आहेत. त्यामुळे सर्व महिला एकमेकींना भेटु शकतात बोलु शकतात.

कोणत्याही समस्येचं मुळ शोधता आलं तर त्यावरचा उपाय शोधता येतो. मात्र त्यासाठी इच्छाशक्तीची जोड हवी, स्वप्नांचे महाल कोणीही बांधु शकतो.

**वॉश बेसिन –** 'येथे थुंकु नये' अशा पाट्या आम्ही सगळीकडे पाहतो, तेव्हा आमच्या मनात विचार आला की, सगळे 'येथे थुंकु नये' हे ठामपणे सांगतात, पण 'येथे थुंकावे' हे कोणीच सांगत नाहीत. त्यावर आम्ही एक भन्नाट युक्ती केली. गावात जागोजागी वॉश बेसिन बसविले. आणि पाट्या लावल्या 'येथे थुंका' तात्पर्य असे की, पर्याय उपलब्ध करून दिला की, कोणी मुद्दामहुन घाण करत कशाला बसेल, आमच्या गावात कोणीही रस्त्यांवर थुंकत नाही. जागोजागी बसविलेल्या वॉशबेसीनमुळे सर्वांना वारंवार हात धुण्याची सवय लागली आहे. स्वच्छ भारत मोहीम सुरू होण्यापूर्वीच आमच्या गावाने स्वच्छतेचा वसा घेतला आहे. हे नमूद करवयास आम्हांला अभिमान वाटतो.

**ग्रामपंचायतीचे ट्रॅक्टर –** व्यक्तींच्या वैयक्तिक स्वच्छतेशिवाय घर आंगण आणि परिसर स्वच्छताही महत्वाची असते. आमच्या ग्रामपंचायतीने या बाबींचा फार गांभीर्याने विचार केला. आणि गांव परिसराच्या स्वच्छतेसाठी एक योजनाच



बनविली. त्यानुसार गांवातील प्रत्येक घरांना ओल्या व सुक्या कचऱ्यांसाठी दोन स्वतंत्र कचऱ्याकुंड्या देण्यात आल्या. ग्रामपंचायतीच्या ट्रॅक्टरमार्फत गृहिणींना जमा केलेला ओला व सुका कचरा उचलला जातो. उचललेल्या कचऱ्यातून विघटनशिल कचरा वेगळा करून गावाबाहेर एका खड्ड्यात टाकून त्यापासून खत निर्मिती केली जाते.

आम्ही नव्याने ग्रामपंचायतीसाठी व्यावसायिक स्वरूपाचे ११ लक्ष रूपयांचे ट्रॅक्टर घेतले आहे. पाटोदा शेती शिवारातील कुणीही शेतकरी बाजार भावापेक्षा कमीदराने शेत मशागत करून घेऊ शकतो. आम्ही जे करतो, ते सर्व हित लक्षात घेवून आणि पारदर्शकता ठेवून ! 'बांधकोरी' चा प्रकार पाटोद्यात दिसणार नाही. कारण नुसता गांव शिवार मोजून आम्ही थांबलो नाहीत तर संपूर्ण गंगापूर पाटोदा शेतीशिवार मोजून, त्यावरील सर्व अतिक्रमण काढून, सर्व बाबींची नोंद



ग्रामपंचायत कार्यालयात घेतली आहे.

**सार्वजनिक धोबिघाट –** आमच्या गावात सार्वजनिक धोबिघाटांचा जन्म कसा झाला, त्याचीही एक कथाच आहे. एकदा मी (भास्करराव पेरे) गावातून फिरत असतांना दोन महिलांचा संवाद माझ्या कानी पडला. एक दुसरीला म्हणत होती, "तुम्ही बऱ्याच दिवसांचे दिसल्या नाहीत. गावाला गेल्या होत्या काय?" त्यावर दुसरी पहिलीला म्हणाली "नाही मी तर येथेच आहे तुम्हीच दिसला



नाहीत" संवाद छोटा होता मात्र तो थेट मनाला भिडला. छोटसं गाव त्यात दोन महिलांची आपआपसांत भेट होत नाही. किंवा त्या एकमेकींना दृष्टीसही पडत नाहीत. याचे कारण शोधले असता लक्षात आले की..... गांव हागणदारीमुक्त झाले, घरोघरी स्वयंपाकाचा गॅस पोहोचला. यामुळे महिलांना बाहेर पडण्याची, एकमेकींमध्येच मिसळण्याची संधी मिळत नव्हती. मग त्यावर काय उपाय करावा. म्हणून सार्वजनिक धोबिघाटाचा जन्म झाला. आज गावाच्या चार बाजुंना चार धोबिघाट आहेत. त्यामुळे सर्व महिला एकमेकींना भेटु शकतात बोलु शकतात. कोणत्याही समस्येचं मुळ शोधता आलं तर त्यावरचा उपाय शोधता येतो. मात्र त्यासाठी इच्छाशक्तीची जोड हवी. स्वप्नांचे महाल कोणीही बांधु शकतो.

**भानुदास मुचक शौचालय**

आपण आमच्या गावात आलांत की, भानुदास मुचक यांच्या शौचालयाची आवर्जुन पाहणी करा. अतिशय कमी खर्चात, कमी जागेत आणि वर्षानुवर्ष टिकणारे असे शोष खड्ड्यांचे शौचालय आपणांस पाहण्यास मिळेल. २ X २ चे दोन शोष खड्डे तयार करून हे शौचालय बांधले आहे. सन २०१९ या वर्षात या शौचालयाला बावीस वर्षेपुर्ण झाली आहेत. कुटुंबाचे पाच सदस्य व येणारे जाणारे पाहुणे गेल्या बावीस वर्षापासून सातत्याने या शौचालयाचा वापर करत आहेत. एक खड्डा भरण्यास आठ ते दहा वर्षाचा काळ लागला. हे शौचालय बांधण्यासाठी त्याकाळात २००० रू. खर्च आला होता.

जागा, पैसा अशी कारणे सांगणाऱ्यांसाठी ही शौचालय पाहून बोध घेण्याची गरज आहे. वाचकांना अधिक माहितीसाठी व संपर्कासाठी श्री भानुदास मूचक यांचा संपर्क क्रमांक खाली देत आहोत.

**श्री. भानुदास मुचक मो. ९९२२३४९६२७**

# १४. दलित वस्ती सुधार



**आमच्या** गावात अनुसुचित जाती आणि जमाती ह्या दोन्ही घटकांचे लोक राहतात. ग्रामपंचायत सर्व सामाजिक समुहांना सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातुन लाभ देण्याचा सातत्याने प्रयत्न करते. दलीत वस्तीतील रस्ते आणि प्रांगणामध्ये सिमेंट ब्लॉक बसविलेले आहेत. नव्यानेच दलीत वस्तीसाठी स्वतंत्र १००० लिटर क्षमतेचे वॉटर हिटर बसविण्यात आले आहे.

दलीत वस्तीतील जी कुटुंबे आर्थिक मागासलेपणांमुळे शौचालय बांधु शकत नव्हती, किंवा एम.आय.डी.सी. चे पाणी कनेक्शन घेउ शकत नव्हती. त्यांना ग्रामपंचायतीने विनामुल्य शौचालये बांधुन दिली आहेत. व एम.आय.डी.सी. च्या पाण्याचे कनेक्शन दिले आहे. गावातल्या कुठल्याही खाजगी किंवा सार्वजनिक सुख:दुखाच्या कार्यक्रमात आम्ही कुठलाही दुजाभाव न करता एक दिलाने एकमेकांची कामे करतो. एकमेकांच्या कामी

# १५. सार्वजनिक बाके



**गावात** ठिकठिकाणी झाडांच्या सावलीत किंवा सकाळी संध्याकाळी ज्येष्ठ नागरिकांना निवांतपणे बसण्यासाठी सिमेंटची बाके बसविण्यात आली आहे.

संध्याकाळच्या किंवा सकाळच्या कोवळ्या उन्हांत आठवणींना उजाळा देत कधीकधी राजकारणांच्या गरम गप्पा करत मित्रांचा घोळका बसलेला पाहून गावाच्या जिवंतपणाची जाणीव होते. काही देणगीदारांनी देणगी देउन तर काही ग्रामपंचायतीकडून अशी ठिकठिकाणी बाके बसविण्यात आली आहेत.



# १६. घरावरील पतीपत्नीचे नांव



**स्त्री** पुरूष समानतेच्या गोष्टी नुसत्या बोलण्यातून व्यक्त करायच्या, त्यापेक्षा त्या कृतीत कशा येतील याचा आम्ही विचार केला. त्यातून गावातील प्रत्येक घरांवर घर क्रमांकासह घरमालक म्हणून पती आणि पत्नी दोघांचे नावे लिहीण्याची कल्पना जन्मास आली. नाव नुसतं घरांच्या भिंतीवर लिहून कसं जमेल? कुटुंबाच्या स्थावर मालमत्तेत पतीसह पत्नींचा अर्धा हक्क कागदोपत्री दाखविण्यात आला. जेणेकरून स्थावर मालमत्तेच्या व्यवहारात पती इतकाच पत्नीला अधिकार हवा. त्यामुळे ८ अ चा उतारा देतांना त्यावर पती आणि पत्नी दोघांची नावे समाविष्ट करण्यात आली आहेत.


# १७. मारोती मंदिर



**पाटोद्याचा** कायापालट होण्याची पहिली पायरी म्हणजे गावांतील मारूतीचे मंदिर. आज ग्रामपंचायत कार्यालयाजवळ दिसणारे मारोतीचे मंदिर एकेकाळी नव्हते. एका छोट्याशा ओट्यावर मारोतीच्या मूर्तीची स्थापना केलेली होती. ती उघड्यावरची मूर्ती पाहून आम्हाला मंदिर उभारण्याचा विचार मनात आला. पण पैशांची वानवा होती. सर्वानुमते मंदिर उभारणीसाठी लागणाऱ्या पैशांच्या तजविजीसाठी लक्की ड्रॉचे आयोजन करून निधी उभारण्याचे ठरवले. अनेक घडामोडीच्या अंती मंदिर उभारले गेले.

नुसत्या विटासिमेंटांचे बांधकाम झाले पण मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्याची प्रक्रिया ही जिकरीची झाली होती. पण इच्छा तेथे मार्ग या प्रमाणे सर्व अडचणींवर मात करून आम्ही मंदिर उभारणीचे काम पूर्णत्वास नेले.

## १८. स्वाध्याय परिवार



**गावातील** स्वाध्याय परिवाराने धार्मिक कार्याबरोबरच गावाविषयी आपली बांधिलकी व कर्तव्यापोटी अनेक कामे केली आहेत. गाव हागणदारीमुक्त करण्यासाठी स्वाध्याय परिवाराची खुप मदत झाली. धर्म आणि धार्मिक आचरण पद्धतीत फक्त देवांचे नामस्मरणच करावे असे नाही, तर कृतीयुक्त आणि विधायक कामेही करावीत. हे त्यांच्या कार्यातून अधोरेखित होते. गावाची साफसफाई झाडांना रंग देणे, सप्ताह जेवण पंगत या अनेक विधायक बाबी पाटोद्यातील स्वाध्याय परिवाराने केल्या. आण्णासाहेब पेरे, नंदकिशोर मातकर, प्रल्हाद शहाणे, संगीता मुंडे, जयश्री चौधरी आणि विशेषतः दहीभाते परिवार आणि त्यांचा सर्व स्वाध्याय परिवार यांनी पाटोद्याच्या प्रगतीत आपले योगदान दिले.

## १९. रस्त्यावरील झाडे



**पाटोद्याच्या** सर्व रस्त्यांवर घरासमोर मोकळ्या जागी सगळीकडे हिरवीगार झाडे आहेत. पाटोद्याला आलेला हा हिरवा रंग सहजासहजी आला नाही. त्यासाठी कष्ट करावे लागले. सातत्याने झाडांची काळजी घ्यावी लागली. आजमितीस पाटोद्यात चार हजाराच्या आसपास झाडांची संख्या आहे. झाडांमुळे पक्षांचा किलबिलाट असतो. उन्हाळ्यात आजुबाजूला तापमान अत्यंत उष्ण असताना त्या तुलनेत पाटोद्यात तापमान कमी असते.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे...' या तुकारामांच्या उक्तींचा आपण भाषणांमध्ये वारंवार उल्लेख करतो, ऐकतो मात्र स्वतः अंमलबजावणी करत नाहीत ही मोठी शोकांतिका आहे. झाडांमुळे तापमान थंड राहते. प्राणवायु मुबलक प्रमाणात राहतो. मानवी आरोग्यावर त्याचा थेट परिणाम होतो.

या माहिती पुस्तिकेच्या माध्यमातून वाचकांना विनंती करण्यात येते की, पुढील पिढीला चांगला श्वास घेउ द्यायचा असेल तर झाडे लावली पाहीजेत. ती वाढविली पाहीजेत.

मी बऱ्याचदा गमतीने म्हणत असतो, माणसं इतकी बेजबाबदार व स्वार्थी बनली आहेत की, जिवंतपणी झाडे लावत तर नाहीतचं पण मेल्यावर आपल्यासोबत दोन झाडे घेऊन जातात. (सरणांवरची लाकडे)

## २०. वार्षिक ताळेबंद

**सरपंच** पैसे लुबाडतो, ग्रामपंचायत गावांला लुटून खाते असे आपण बऱ्याचदा पाहतो, ऐकतो, वाचतो पण आमच्या येथे या गोष्टींना थाराच नाही. मी (भास्करराव पेरे) माझ्या प्रामाणिकपणांचा दावा करतोय असा अर्थ घेउ नका. तर आम्ही आमचा ग्रामपंचायतीचा वार्षिक ताळेबंद ऑनलाईन इंटरनेटवर टाकतो. तुम्ही तो कोठेही आणि कधीही पाहू शकता. ग्रामपंचायतीचा कारभार इतका पारदर्शी असेल तर सरपंच आणि ग्रामपंचायतीच्या कारभारांवर संशय घ्यायला जागा उरतेच कोठे?

## २१. ना नफा ना तोटा तत्त्वावर ग्रामपंचायतीची ट्रॅक्टर सेवा



शेतीची कामे ना नफा ना तोटा तत्त्वावर ग्रामपंचायतीच्या ट्रॅक्टर द्वारे करुन देण्यात येते

# भविष्यात करावयाची कामे


आम्ही जिथे आहोत; तेथेच थांबून राहणे आमचा स्वभाव नाही. नवीन आणि सकारात्मक करण्यामध्ये, घडविण्यामागे आम्हाला आवड आहे. त्यातूनच भविष्यात काय करायचे याची यादी आमच्या समोर आहे.


१) दोन स्वतंत्र स्मशानभूमी तयार करणे.
२) चपात्या करून देणे.
३) सॅनेटरी नॅपकिन मशिन घेणे
४) शाळा अद्यावत बांधकाम करणे.
५) व्यायामशाळा
६) बाग
७) आरोग्य उपकेंद्रे
८) जनावराचा दवाखाना
९) सिटी बस सुरू करणे.
१०) बाटली बंद मिनरल पाणी तयार करून बाजारात विकणे.
११) योगा क्लास सुरू करणे.
१२) मुलांकडून स्पर्धा परिक्षेची तयारी करून घेणे.
१३) आधुनिक पद्धतीने शेती करणे.
१४) जास्तीत जास्त नागरीकांकडून देहदान, अवयवदान करवून घेणे .
१५) सामुहिक विवाह करणे.
१६) अंधश्रद्धा निर्मुलन करणे.
१७) गावातील प्रत्येक नागरीकांचे विमा उतरविणे
१८) शेत जमीन खातेमोड करून महिलांच्या नावावर करणे

तुम्हांला एका वर्षाची बिदागी हवी असेल...
तर धान्य पेरा... दहा वर्षांची बिदागी हवी असेल तर माणसे पेरा...
आणि हजारो वर्षांची बिदागी हवी असेल तर विचार पेरा...
– छ. शाहु महाराज



# २२. गावाला चोवीस तास वीज






सन २०१२ च्या अगोदर गावात वीज चोरी होत असे. एमएससीबीकडुन माहिती घेतली असता. जेथे वीज चोरी तिथे लोड शेडिंग हे लक्षात आले. मग एकदा एमएससीबीलाच गांवात रेड टाकायला सांगितिले नंतर २०१२ ला गांवातील इलेक्ट्रिकल शेगड्यांची होळी ग्राम पंचायत समोर केली आणि त्यानंतर मी स्वत: गांवाला आवाहन केले की, वीज चोरी होणार नाही. आणि नंतर सन २०१२ साली गावात गंगापूरने हरी येथे सबस्टेशन बसवले. त्या अंतर्गत ३६ डिपी बसवले आज गांवात वीज चोरी होत नाही. सर्व लोक अंतिम तारखे अगोदर लाईट बील भरणा करतात. गांवात एकही थकबाकीदार नाही. त्यामुळे गांवात कधी लाईट जाते ती तांत्रिक अडचणीमुळे पण लोडशेडिंग नाही २४ तास लाईट आहे.

## २३. सॅनिटरी नॅपकिन



सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशिन



सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशिन

महिलांच्या आरोग्याच्या विचार करून ग्रामपंचायतीने सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशिन व डिस्पोजल मशिन घेतल्या आहेत व गावातील सर्व महिलांना फ्री सॅनिटरी नॅपकिन वाटप केले जातात.



## २४. वाय



ग्रामपंचायतीचा कर भरणा करणाऱ्यास फ्री

## २५. स्मशानभुमी



गावात निसर्गरम्य सार्वजनिक स्मशानभुमी आहे
१०० जांभळीचे झाडे आहे

## २३. सॅनिटरी नॅपकिन



सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशिन



सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशिन

महिलांच्या आरोग्याच्या विचार करून ग्रामपंचायतीने सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशिन व डिस्पोजल मशिन घेतल्या आहेत व गावातील सर्व महिलांना फ्री सॅनिटरी नॅपकिन वाटप केले जातात.




## २४. वायफाय फ्री



ग्रामपंचायतीचा कर भरणा करणाऱ्यास फ्री वायफाय सुविधा देण्यात येते.


## २५. स्माशनभुमी



गावात निसर्गरम्य सार्वजनिक स्मशानभुमी आहे. स्मशानभूमीलगत १०० जांभळीचे झाडे आहे.

## २६. अंत्यविधीसाठी गोवऱ्याचा वापर फायदेशीर





* पर्यावरणपुरक असल्यामुळे प्रदूषण होत नाही.
* गोवऱ्यामुळे गावातील महिलांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो.
* वृक्षतोड होत नाही व वसुंधरा हिरवीगार राहते.
* लाकडांपेक्षा गोवऱ्यांना अत्यल्प खर्च येतो.



## २७. गावात रसवंती मशिनची सुविधा





उन्हाळ्याच्या ऋतूमध्ये गावात मोफत ऊसाचा रस मशिन सुरु करण्यात आलेली आहे. ऊस आरोग्यासाठी उपायकारक असतो. त्या कारणाने ग्रामपंचायतीने गावात नागरिकांच्या आरोग्याच्या काळजीपोटी थंडगार रस देणाऱ्या मशिनची व्यवस्था केलेली आहे. गावातील नागरिक थंडगार रस पिऊन तृप्त होतात. मोफत ऊसाचा रस मशिन ही महाराष्ट्रातील एक आगळीवेगळी संकल्पना आहे. ही संकल्पना गावात यशस्वी झालेली आहे.

## २८. प्लास्टिक मुक्त गाव उपक्रम



ग्रामपंचायत पाटोदा प्लास्टिक खरेदी करत असल्यामुळे गावात प्लास्टिकचा कचरा दिसत नाही. त्यामुळे गावत प्लास्टिकपासून होणाऱ्या प्रदूषणावर मात करण्यात आली आहे. प्लास्टिकचे महत्त्वाचे गुणधर्म म्हणजे प्लास्टिक कुजत नाही, गॅसेस निर्माण होतात तसेच जनावरांच्या पोटात गेल्यास त्यांना असाध्य रोग होऊन ते दगावण्याची भिती निर्माण होते. म्हणून हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे.

## २९. नियमित कर भरणाऱ्या नागरिकांच्या हस्ते ध्वजारोहण



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, १ मे महाराष्ट्र दिन, १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन, १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन या राष्ट्रीय उत्सवानिमित्त ग्रामपंचायतीचा नियमित कर भरणाऱ्या नागरिकांच्या हस्ते ध्वजा रोहणाचा कार्यक्रम संपन्न होतो.



## ३०. कराटे प्रशिक्षण कार्यक्रम



## ३१. मुलींना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण




* करा‌टे प्रशिक्षण वर्गामुळे शरीर निरोगी व सुडोल होते.
* कराटे प्रशिक्षणामुळे आत्मविश्वस वृद्धिंगत होतो.
* कराटे प्रशिक्षणामुळे एकाग्रता वाढते.
* कराटे प्रशिक्षणामुळे मानसिक विकास व नेतृत्व क्षमता निर्माण होते.

## ३२. वृद्धांसाठी मसाज मशिन




वृद्धापकाळाच्या त्रासाच्या मुक्तीसाठी आदर्श गांव पाटोदा ग्रामपंचायतने मसाज मशिन उपलब्ध केली आहे.

## ३३. लाकडी तेल घाणा




नियमित कर भरणाऱ्या नागरिकांनी आणलेल्या तेल बीयापासून लाकडी घाण्याच्या माध्यमातून शुद्ध खाद्यतेल मोफत दिले जाते.


## ३४. सौर विद्युत निर्मिती प्रकल्प



विज निर्मिती या प्रकल्पात मुख्यत्वे उष्णतेचा वापर करुन पाण्याची उच्च दाबावर वाफ बनवली जाते. या उच्च दाबाच्या वाफेचा वापर करुन विद्युत जनित्रास गती दिली जाते. त्यातुन विज निर्मिती होते.



## ३५. एक्कावन्न फुट ध्वज स्तंभ




स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आदर्श गाव पाटोद्याचे सरपंच, उपसरपंच, व सर्व ग्रामपंचायत कार्यकारिणी सदस्य यांच्या संकल्पनेतून उभारलेल्या ५१ फुट उंचीच्या राष्ट्रध्वज स्तंभावर स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावून ध्वजास मानवंदना देण्यात आली. यानंतर २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, १ मे महाराष्ट्र दिन, १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तिदिन यादिवशी याच स्तंभावर ध्वजास मानवंदन देण्यात येईल.



## ३६. ना अजान... ना हनुमान चालीसा पाटोद्यात रोज सकाळी राष्ट्रगीत




स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त देशात व राज्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. घरा-घरावर तिरंगा फडकविण्याचेही नियोजन केले जात आहे. त्यातुन राष्ट्रभक्ती वृद्धींगत होणार आहे. हाच संदेश देण्यासाठी पाटोद्याचे सरपंच, उपसरपंच व गावकऱ्यांनी गावात लाऊडस्पिकरवर राष्ट्रगीत वाजवण्याचा पहिला ठराव घेतलेला आहे. या ठरावाद्वारे ग्राम पंचायतीने गावात महत्त्वाच्या ठिकाणी लाऊडस्पिकरची व्यवस्था केलेली आहे. या लाऊडस्पिकरमधून रोज सकाळी राष्ट्रगीताचे प्रक्षेपण केले जात आहे. त्याचप्रमाणे गावातील नागरिक राष्ट्रगीत सुरु झाल्यानंतर असेल त्या ठिकाणी उभे राहून राष्ट्रगीताचा सन्मान करतात असे उपसरपंचांनी सांगितले.